CMYK

सायं. दैनिक
# माझी सरकार

www.majhisarkar.com

• संपादक : शेख फारुक हमीद • मो.9423309302






बीड ▪ बुधवार दि. ०२ एप्रिल, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2023/88578 ▪ majhisarkar2023@gmail.com ▪ वर्ष २ ▪ अंक २३३ ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रु.

Beed ▪ Wednesday 02 April, 2025 ▪ RNI : MAHMAR/2023/88578 ▪ majhisarkar2023@gmail.com ▪ Year-2 ▪ Issue-233 ▪ Pages 4 ▪ Price 3


# राख, वाळूच्या सर्व गँगला सुतासारखं सरळ करणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

## बीडच्या वाढती गुन्हेगारीवर अजित पवारांचा इशारा

### डोक्यातले जातीचे खूळ काढा, अजित पवारांचे आवाहन

कुठेतरी मागे झालेल्या चुका आता टाळल्या पाहिजेत. आता आपल्याला नवीन पिढीसाठी काहीतरी केले पाहिजे. तुम्ही थोडं दम धरा, मी काय करतो ते बघा. बीडमध्ये अनेक गोष्टी करण्याचा माझा प्रयत्न आहे. एकदा डोक्यातील जातीचे खूळ काढून टाका, असे आवाहन अजित पवार यांनी केले. सगळी हाडामासांची माणसे आहेत, सगळ्यांचे रक्त लालच आहे, असेही ते म्हणाले. मी इथले राजकारण गेली अनेक वर्षे बघतोय, जातीच्या मुद्द्यावरुन समाजात फूट पाडायची आणि आपली राजकीय पोळी भाजायची, हे सुरु आहे, अशी टीका अजित पवारांनी केली. इतक्या वर्षांमध्ये बीडला किती मंत्रिपदे आणि पदे मिळाली, पण विकास काय झाला, याचा विचार केला पाहिजे. मी महापुरुषांच्या पुतळ्यासंदर्भात पोलीस अधिकाऱ्यांशी बोललो आहे. कुठल्याही महापुरुषांविषयी माझ्या मनात श्रद्धेची, मानाची आणि आदराची भावना आहे, असे अजित पवार यांनी सांगितले.





सायं. दैनिक माझी सरकार नेटवर्क

बीड : राख, वाळूसह सर्व गँगला सुतासारखं सरळ करणार', असा इशारा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडमधून दिला. अजित पवार बीड दौऱ्यावर आहेत. यावेळी तरुणांशी संवाद साधताना अजित पवार यांनी बीडमधील वाढती गुन्हेगारीवर मोठं विधान केले आहे. आता सर्व गँगला सुतासारखं सरळ करणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. तसंच त्यांनी बीडकरांना घाबरू नका मी तुमच्यासोबत आहे असं देखील सांगितले.

अजित पवार यांनी गँगला इशारा देत सांगितले की, 'इथे राख, वाळू अशा सगळ्या गँग आहेत. मात्र आता सगळ्या गँग बंद करणार आहे. आता सर्व गँगला सुतासारखे सरळ करणार आहे. तुम्ही घाबरु नका मी आहे. आता विकास कामे करताना रास्ता कागदावर दाखवून

» पान २ वर



### धनंजय मुंडे यांची अनुपस्थिती...!



राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार आज (२ एप्रिल) बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) प्रमुख नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे प्रकृती अस्वास्थ्यामुळे या दौऱ्यात सहभागी होणार नसल्याची माहिती पुढे आली आहे. धनंजय मुंडे यांनी स्वतः ट्विट करत आपल्या अनुपस्थितीबाबत स्पष्टीकरण दिले आहे. मुंडे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बीडमधील नियोजित दौऱ्यात सहभागी होण्याचा माझा पूर्ण विचार होता. मात्र, प्रकृती अद्याप ठीक नसल्याने उपचारासाठी मुंबई गाठावी लागली आहे. त्यामुळे बीडमधील आजच्या कार्यक्रमांना मी उपस्थित राहू शकत नाही. या संदर्भात पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना पूर्वसूचना दिली आहे, त्यामुळे कोणताही संभ्रम निर्माण होऊ नये.राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार आज (२ एप्रिल) बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) प्रमुख नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे प्रकृती अस्वास्थ्यामुळे या दौऱ्यात सहभागी होणार नसल्याची माहिती पुढे आली आहे. धनंजय मुंडे यांनी स्वतः ट्विट करत आपल्या अनुपस्थितीबाबत स्पष्टीकरण दिले आहे.

### आजचे पुढारी पाया पडण्याच्या लायकीचे नाहीत

कर्मधर्म सहयोगाने आई-बापाच्या कृपेने, चुलत्याच्या कृपेने आमचे बरेच चांगले चालले आहे. आम्हाला काही देऊ नका फक्त प्रेम द्या. माझा नमस्कार घ्या, तुमचा नमस्कार करा. पायाही पडू नका. आजचे पुढारी पाया पडण्याच्या लायकीचे नाही. ज्याच्या पाया पडता, त्याचा इतिहास आठवा. आई-बापाच्या, गुरुंच्या पाया पडा. पूर्वी यशवंतराव चव्हाण, वसंतदादा, वसंतराव नाईक यांसारखी आभाळाएवढी मोठी माणसे होती. त्यांच्यापुढे नतमस्तक होऊ. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजमाता जिजाऊ, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, मौलाना आझाद, अण्णभाऊ साठे यांसारखे महान युगपुरुष होऊन गेलेत. त्यांच्या पाया पडा, असे आवाहन अजित पवार यांनी केले.

## आदित्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त ३४० जणांचे रक्तदान

सायं. दैनिक माझी सरकार नेटवर्क

बीड : आदित्य शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तसेच द्वारकादास मंत्री बँकेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. या रक्तदानाच्या उपक्रमाला दात्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देत तब्बल ३४० जणांनी रक्तदान केले त्यामध्ये ९५ महिला २४५ पुरुष सहभागी झाले होते. जिल्हारूग्णालयात रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर आदित्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तसेच द्वारकादास मंत्री बँकेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त राबवलेल्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे. आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी नेहमीच प्रत्यनशिल असलेले संस्थापक अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार १ एप्रिल रोजी शिक्षण संस्थेत आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन सीए. गिरिश गिल्डा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला डॉक्टर हिमांशू श्रीवास्तव, डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. कल्याण अपेट, शाम भुतडा, डॉ. सतीश कचरे, डॉ. अमोल सानप, डॉ. बालाजी बहिरवाल, डॉक्टर विकास गर्जे यांच्यासह असंख्य लोक उपस्थिती होते. शिबिरात सहभागी झालेल्या रक्तदात्यांना प्रमाणपत्र व अल्पोपाहार देण्यात आला. रक्तसाठ्याची गरज लक्षात घेऊन भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला. रक्तदान हा समाजासाठी

» पान २ वर



## तहसीलदाराच्या दालनासमोरच शेतकऱ्याने अंगावर पेट्रोल ओतून घेतले

### सायंकाळी उशिरापर्यंत तहसीलदार पोलीस निरीक्षक कार्यालयत ठाण मांडून

सायं. दैनिक माझी सरकार नेटवर्क

किल्ले धारूर : मोजणी केलेली शेताची पाहणी करण्यासाठी तहसील प्रशासन पोलिसासह आसरडोह येथील शेतात गेल्यानंतर एका शेतकऱ्याने अंगावर पेट्रोल ओतून घेतल्याची घटना तहसील कार्यालयात तहसीलदार यांच्या दालनासमोर मंगळवारी दुपारी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली. तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यास धरल्यामुळे पुढील अनर्थ टाळला अशोक रामकिसन शिंदे असे या शेतकऱ्याचे नाव आहे. धारूर तालुक्यातील आसरडोह येथील दीपक साळुंखे यांची सर्वे नंबर २३९ मध्ये २२ एकर जमीन आहे. या जमिनीतील काही भागावर शेजारीच असलेल्या सर्वे नंबर मधील काही शेतकऱ्यांनी अतिक्रमण केलेले आहे. या संदर्भात दीपक साळुंखे यांनी शासकीय नियमानुसार सर्वे नंबर २३९ ची मोजणी आठ महिन्यापुर्वी केलेली आहे. मोजणी केलेली असतानाही शेतकरी मोजणी प्रमाणे जमीन वहीती करू देत नव्हते मोजणी केलेली जमीन वैदिक करून देत नसल्याने ७ मार्च रोजी दीपक साळुंखे या शेतकऱ्याने पोलीस प्रशासनाकडे२६ हजार रुपये भरून मोजणीक जमीन ताबा देण्यासाठी विनंती केली होती. संबंधित लगतचे शेतकरी अतिक्रमण केलेली जमीन सोडत नसल्याने अतिक्रमण झालेले

» पान २ वर



## देवराई वनप्रकल्पाची दुरावस्था पाहून सयाजी शिंदेकडुन तिव्र नाराजी

### वनविभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना तर कायमस्वरूपी पाणी प्रश्न मिटावा : डॉ.ढवळे



सायं. दैनिक माझी सरकार नेटवर्क

बीड : पहिले जागतिक वृक्षसंम्मेलन झालेल्या बीड तालुक्यातील पालवण येथील सह्याद्री देवराई या वनप्रकल्पाची दुरावस्था पाहुन सिने अभिनेते व देवराईचे प्रणेते सयाजी शिंदे यांनी हळहळ व्यक्त केली. देवराईच्या वनप्रकल्पातील झाडांची निगा व संगोपनाबाबत आणि वारंवार लागणाऱ्या आगीच्या अनुषंगाने वन अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. सिने अभिनेते सयाजी शिंदे यांच्या संकल्पनेतून बीड तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली सह्याद्री देवराई हा वनराईचा प्रकल्प उभारण्यात आला होता. वनसंवर्धनासाठी उचलण्यात आलेले हे

» पान २ वर

## जिल्हा वाहतुक शाखेचा वैद्यनाथाच्या नगरीत नियम मोडणाऱ्या वाहनधारकांना दणका

### ९५ केसेस व ६६ हजार रुपयाचा ठोठावला दंड चोरीचे वाहन संभाजीनगर पोलीस स्टेशनला जमा

सायं. दैनिक माझी सरकार नेटवर्क

बीड : जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शन आणि जिल्हा वाहतुक शाखेची कटाक्ष नजर यामुळे वाहन चोरी करणार्या आरोपींचे चांगलेच धाबे दणाणले आहे. अशातच परळी वै.येथे वर्षभरापुर्वी चोरीला गेलेले वाहन तपासणीदरम्यान चोरीचे आढळून आल्याने संबंधित आरोपीस वाहनासह पकडून कारवाई करण्यात आली त्यामुळे नागरिकांतून पोलीसांच्या कामांविषयी समाधान व्यक्त केले जात आहे. याबाबत माहिती अशी की, बीड जिल्ह्यात सद्यस्थितीला पोलीस




अधिक्षक नवनीत सर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेगारांचे कंबरडे मोडले असून यापुर्वी २४ तासाच्या आत गुन्हेगारांवर भारतीय न्याय संहिते अंतर्गत कायदेशीर कारवाई केल्याच्या घटना घडल्याने गुन्हेगारांना चांगलाच वचक बसला आहे त्यामुळे बीड

» पान २ वर

## मस्जिद बॉम्बस्फोट आरोपींवर दहशतवादी कायद्यांतर्गत कार्यवाही करा : उस्मानिया फाउंडेशन



सायं. दैनिक माझी सरकार नेटवर्क

माजलगाव : गेवराई तालुक्यातील अर्धमसला येथील मक्का मस्जिद मध्ये झालेल्या स्फोटाची सखोल चौकशी करुन संबंधित आरोपींवर दहशतवाद विरोधी कायदा (UAPA Act.1967) व राष्ट्रीय सुरक्षा कायदा (NSA Act.) अंतर्गत गुन्हा दाखल करुन कठोर शिक्षा देण्यात यावी अशी मागणी उस्मानिया फाउंडेशन माजलगाव संघटनेच्या वतीने आ. प्रकाश सोळंके यांना निवेदन देऊन मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. दि.३० मार्च २०२५ रोजी अर्धामसला ता. गेवराई जि.बीड येथील मक्का मस्जिद मध्ये स्फोट घडविणारे आरोपींनी मुस्लिम समाजाच्या पवित्र मस्जिद मध्ये दोन समाजामध्ये तेड निर्माण करण्याच्या उद्देशाने देशात दहशतवाद

» पान २ वर

# धारूर दुय्यम निबंधक कार्यालयात दलालांचा सुळसुळाट

## दलाला मार्फतच अधिकाऱ्यांचा किस्सा होतोय गरम

सायं. दैनिक माझी सरकार नेटवर्क

किल्ले धारूर : धारूर तहसील कार्यालयात असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयात स्थावर मालमत्ता खरेदी करण्यासाठी आलेल्या नागरिकांची बाहेरील दलाल तसेच आतील अधिकारी दलाला मार्फत नागरिकांची आर्थिक लूट करत आहेत. हे कित्येक वर्षा पासून सुरू आहे. या कार्यालयात दलालांचा सुळसुळाट झाल्याचे दिसून येत आहे. या विषयी अधिक माहिती अशी की नाही धारूर तहसील कार्यालयात दुय्यम निबंधक कार्यालय आहे या ठिकाणी स्थावर मालमत्तेची खरेदी विक्री ची रजिस्ट्री केली जाते केली हे कार्य कार्यालयातून व्हायला हवे परंतु असे न होता येथील अधिकारी नागरिकांना दलालान कडे पाठवतात त्या ठिकाणी नागरिकांची दलाल फसवणूक करतात त्यांना घाबरतात तुमचे काम अडचणीचे आहे असे सांगतात जर करावयाचे असेल तर तुम्हाला साहेबाना पैसे द्यावे लागतील ते आमच्या कडे द्यावा. सर्वसामान्य नागरिक घाबरतात यांच्या जाळ्यात अडकतात त्यांना पैसे देतात.विविध रक्कम लावतात यातून रजिस्ट्री खर्च झाल्या पेक्षा जास्त पैसे घेतले जातात. हा लुटीचा धंदा अनेक वर्षा पासून सुरू आहे तो आता तरी बंद व्हायला हवा. धारूर दुय्यम निबंधक कार्यालयात बाँड विक्रेता परवाना असलेले काही जण दस्त आवेज लेखन करत आहेत ही बाब चुकीची आहे परंतु अधिकाऱ्यांशी संगनमत करून असे कार्य केले जाते. दस्त अवेज लेखनकार ही वेगळी नेमणूक असते परंतु या कार्यालयात सगळे नियम धाब्यावर बसून मोठ्या प्रमाणात नागरिकांची लूट केली जात आहे.




CMYK

# मराठवाडा जनता विकास परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी राजेंद्र आगवान



सरकार नेटवर्क

माजलगाव : मराठवाडा जनता विकास परिषदेची जिल्हा बैठक माजलगाव येथे पार पडली. या बैठकीत विकास परिषदेचे विद्यमान अध्यक्ष श्री.राजेंद्र आगवान यांची एकमताने फेर निवड करण्यात आली. नियमाप्रमाणे तीन वर्ष नंतर जिल्हा विकास शाखेची निवडणूक होते. मात्र माजलगाव येथे झालेल्या जिल्हा बैठकीत माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख, प्राचार्य डी.एच.थोरात, प्राचार्य सोनवळकर, अंबाजोगाई प्राचार्य इदाते सर आष्टी तसेच या बैठकीस गदळे सर, संतुक मुळे, सुहास देशमुख, हेमांशू देशमुख, सौंदळे आदि उपस्थित होते. संचालन सुमंत गायकवाड यांनी केले.मराठवाडा जनता विकास परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी राजेंद्र आगवान यांची एकमताने फेर निवड झाल्याबद्दल माजी आ.डी.के.देशमुख यांनी स्वागत केले.

# छावा जिल्हा प्रमुख शिवाजी दादा ठोंबरे यांना बंधुशोक



सरकार नेटवर्क

केज : तालुक्यातील मौजे उंदरी येथील नरसिंह ( बापू) आबासाहेब ठोंबरे यांचे दिनांक - ३० मार्च रोजी तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याने ठोंबरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.ते छावा मराठा संघटनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी दादा ठोंबरे यांचे लहान बंधू होते. स्व. नरसिंह ( बापू) आबासाहेब ठोंबरे हे कळंब येथे बहिणीकडे शिकण्यासाठी म्हणून गेले होते. तेथेच अकरावी पर्यंत शिक्षण घेत गुजरात येथे कंपनीत काम करून राजेश बॅटरी नावाने बॅटरीचा व्यवसाय मेहुण्यांनी सुरू करून दिला. मात्र स्वकर्तुत्वाने त्यांनी या छोट्या व्यवसायातून वटवृक्ष निर्माण केला. ज्याचे आज पुणे,लातूर, बीड, धाराशिव, केज या ठिकाणी शाखा आहेत. स्वकर्तत्वावर धाराशिव जिल्ह्यातील एक नामांकित व्यापारी म्हणून ओळखले जात होते. अनेकांना रोजगार उपलब्ध करून कुटुंबाचा आधार बनले होते. अगदी कमी वयात कमी ,अल्प कालावधीत त्यांनी गरुड झेप घेऊन जगाच्या पुढे एक आदर्श ठेवला आहे. त्यांच्या पश्चात एक चुलते, एक चुलती, आई,पत्नी, दोन मुले, चार भाऊ, पाच बहीणी असा मोठा परीवार आहे.

# तुषार झाडके एम. बी. बी. एस. परीक्षेत उत्तीर्ण!



सरकार नेटवर्क

कळंब : कळंब तालुक्यातील मंगरूळ येथील तुषार झाडके यांचे एमबीबीएस शिक्षण एम. आय. एम .एस .आर. मेडिकल कॉलेज लातूर येथून पूर्ण झाले. यांनी एमबीबीएस परीक्षेचा अंतिम निकालामध्ये उत्तीर्ण होऊन कळंब तालुक्यातील मंगरूळ च्या नावलौकिकेत भर पाडली. सर्वसामान्य कुटुंबातील एमबीबीएस परीक्षेत उत्तीर्ण होऊन यश मिळवले. गावकऱ्यांच्या वतीने भूमिपुत्राचे कौतुक व अभिनंदन करण्यात आले येणाऱ्या काळात भूमिपुत्राकडून व सामान्य जनतेची सेवा घडावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

# चकलांब्यात यंदा वस्त्रहरण;चैत्र पौर्णिमेची जय्यत तयारी

सरकार नेटवर्क

बीड : काही वर्षांपूर्वी मराठी रंगभूमीवर प्रचंड गाजलेलं, मच्छिंद्र कांबळी यांचं 'वस्त्रहरण' हे धमाल विनोदी मालवणी नाटक मराठी भाषेत पुन्हा एकदा रंगभूमीवर धूमशान घालण्यास सज्ज होत आहे. या नाटकाचे आजवर ५२५४ प्रयोग झाले असून, लवकरच या नाटकाचा ५ हजार २५५ वा प्रयोग सादर होणार आहे. विशेष म्हणजे चकलंबा येथील कलाकारांच्या संचात या नाटकाचे मोजके ४४ प्रयोग केले जाणार आहेत.मराठी भाषेत रूपांतरित असलेले हे नाटक बघण्याची उत्सुकता लागली आहे,दि १२ एप्रिल रोजी चैत्र पौर्णिमाच्या दिवशी रात्री ८ वाजता हा नाट्य प्रयोग सादर होणार आहे. या अजरामर कलाकृतीला १६ फेब्रुवारी,२०२५ रोजी ४५ वर्षं पूर्ण झाली.दि १२ एप्रिल रोजी



चकलंबा येथे चित्र पोर्णिमेनिमित्त हे नाटक पुन्हा रसिकांच्या भेटीला येत आहे. येत्या चैत्र पौर्णिमेला हे नाटक चकलांबा रंगभूमीवर गावातील कलाकार संदिप पारगावकर,डॉ.विजय सुलाखे,प्रा.सतीश सुलाखे, रविंद्र कानडे,सुभाष चोपडे , उदय सुलाखे,कालिदास चोपडे ,सुरेंद्र सुलाखे,दर्शन नाईक,किशोर खेडकर,मयुर कुलकर्णी,श्याम कोळसे , ऋषिकेश सुलाखे,शुभम चोपडे,कृष्णा कुलकर्णी, उन्मेष सुलाखे,महिला कलाकार -मंजुश्री जोशी,आशा तारे हे कलाकार हा प्रयोग सादर करणार आहेत. नाटकाचे दिग्दर्शन इंजि.संतोष पारगावकर करत आहे तर ,सूत्रधार म्हणून धनंजय सुलाखे,संगीत दिग्दर्शन प्राध्यापक सतीश सुलाखे,संपादक प्रशांत सुलाखे,पुजा सुलाखे/सराफ, अर्णव सुलाखे करणार आहेत.सर्व प्रेक्षकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री रोकडेश्वर प्रासादिक नाट्य मंडळ चकलंबा यांनी केले आहे.

# किल्ले धारूर भाजपाच्यावतीने शहरात मन की बात



सरकार नेटवर्क

किल्ले धारुर : येथे कैप्टन राजपालसिंह भैया हजारी इंग्लिश स्कूल या आज दिनांक ३०/३/२०२५ रोजी देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय श्री नरेंद्र मोदी साहेब यांचा मन की बात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या भारतीय जनता पार्टी प्रदेष कार्यकारणी सदस्य तथा नगरअध्यक्ष डॉ. स्वरुपसिंह हजारी साहेब, तालुका अध्यक्ष एडवोकेट बालासाहेब चोले, शहर अध्यक्ष दत्ताभाऊ धोत्रे, भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष गणेश बड़े, भाजपा यूवा मोर्च शहर अध्यक्ष एडवोकेट मोहन भोसले, सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी, नगरसेवक सचिन दुबे, नदीम मोमिन, मन की बात प्रमुख रामप्रभु मुंडे, संदीप काचगुंडे, विजय माने, अशोक माने, दत्ता माने, शिवाजी माने, मुस्ताक तांबोली, संतोष सोनटके, अजय माने, राजेंद्र गायकवाड, बालू पांचाल व सर्व पधाधिकारी कार्यकारते उपस्थित होते.

# ॲड. प्रविण मेटे यांच्याकडे सरपंच पदाचा पदभार



सरकार नेटवर्क

केज : तालुक्यातील राजेगाव येथील सरपंच सौ. सुशीला मस्के यांची जनतेतून बिनविरोध निवड करण्यात आली होती. निवडणूक आयोगाने जात वैधता प्रमाणपत्र मुदतीत दाखल करण्याचे निर्देश दिले होते. परंतु ते दाखल न केल्याने सदरील सरपंच पद हे अपात्र करण्यात आले. त्यामुळे सरपंच पदाचा पदभार ॲड. प्रविण मेटे यांच्याकडे बहुमताने देण्यात आला. त्यामुळे राजेगाव सारख्या गावाला एक तरुण सरपंच मिळाला आहे. त्यामूळे गावातील शिक्षण, आरोग्य, स्वच्छता व महत्त्वाचा म्हणजे जलजीवन चा प्रश्न लवकरच मार्गी लागेल अशी चर्चा तरुणांमध्ये दिसत होती. तरुण नेतृत्वामुळे गावातील सामाजिक सलोखा व विकासाचे धोरण घेऊन नक्कीच हे नेतृत्व गावाचा कायापालट करेल अशी जनतेचीअपेक्षा आहे.

# गेवराईत शेतकऱ्याचे भरदिवसा घर फोडले, नऊ लाखाचा ऐवज लंपास

सरकार नेटवर्क

गेवराई - घराला कुलूप बंद करुन शेतात काम करण्यास गेलेल्या गेवराईतील शेतक-याचे भरदिवसा घर फोडून आज्ञात चोरट्यांनी नऊ लाखाहून ऐवज लंपास केल्याची घटना काल दुपारी दोन वाजेच्या सुमारास घडली. मजुरांच्या तुटवडा जाणवत असल्याने ग्रामीण भागातील गावखेड्यातील शेतकरी कुटुंबिय शेतात राबत आहेत. काल शुक्रवारी सुर्डी बुद्रुक ता. गेवराई जि. बीड येथील रणजित तुकाराम सोळंके यांचे कुटुंबीय घर कुलूपबंद करुन शेतात काम करण्यासाठी गेलेले होते. याच संधीचा फायदा घेत आज्ञात चोरट्यांनी कुलुप तोडुन घरात प्रवेश करत भरदिवसा दोन वाजेच्या सुमारास घरफोडी करुन चार लाख रुपये रोख रक्कम तसेच आठ तोळे सोन्याचे दागिने असा जवळपास नऊ लाखाहून आधिक ऐवज लंपास केल्याची माहीती शेतक-याने दिली.

दरम्यान शेतकरी रणजित सोळंके यांच्या घरी धाडसी चोरी झाल्याची माहीती तलवाडा यांना मिळताच सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके, फौजदार स्वप्नील कोळी, पोलीस जमादार हनुमंत जावळे, विठ्ठल चव्हाण यांनी घटनास्थळावर दाखल होऊन पाहणी केली. ठसे (फिंगरफ्रीट) घेण्यात आले असून, आज दुपारनंतर किती ऐवज गेला शेतकरी यांच्या माहीतीवरुन गुन्हा दाखल करण्यात येईल असे पोलीसांनी सांगीतले. भरदिवसा घर फोडल्यच्या या धाडसी चोरीने ग्रामीण भागातील गावखेड्यातील शेतकरी कुटुंबियात भीतीयुक्त वातावरण निर्माण झाले आहे.

# कला हे मानवी जीवनाचे वैशिष्ट्य- डॉ.किशोर शिरसाट

सरकार नेटवर्क

जालना - जिथे विज्ञान संपते तिथून कलेचा आरंभ होतो. ललित कलांनी माणसाचं जगणं आनंददायी केलं आहे. कला हे मानवी जीवनाचे वैशिष्ट्य आहे असे प्रतिपादन मराठवाड्यातील ज्येष्ठ रंगकर्मी व स.भु. महाविद्यालय, संभाजीनगरच्या नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. किशोर शिरसाट यांनी केले. सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने जालना येथे राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात संपन्न

झालेल्या दहा दिवसीय नाट्य प्रशिक्षण शिबिराच्या समारोप प्रसंगी डॉ. सिरसाट बोलत होते यावेळी माजी आमदार व भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नारायणराव मुंडे अध्यक्षस्थानी होते तर नाटककार दिग्दर्शक डॉ. सतीश साळुंके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. शिरसाट पुढे म्हणाले की, नाटकाचा प्रयोग काही तासांचा असला तरी त्यासाठी प्रचंड परिश्रम घ्यावे लागते आणि शेवटी नाटक हा जगण्याचा श्वास होऊन बसतो. या वेळी डॉ साळुंके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, कालपरत्वे मानवी जीवनात स्थित्यंतरे येत आहेत. कला मानवी जीवनासाठी असेल तर कलेच्या ध्येय आणि उद्दिष्टांमध्ये ही मानवी जीवनाप्रमाणे बदल होणे गरजेचे आहे. आज नाटक केवळ मनोरंजनासाठी नव्हे तर सामाजिक मन बदलण्यासाठी व्हावे. म्हणून रंगभूमी ही विचारांची रणभूमी होणे आवश्यक आहे. यावेळी नारायणराव मुंडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. ते म्हणाले, कलेचा इतिहास पाहता समाजाच्या उपेक्षित समूहानेच खऱ्या अर्थाने ही कला जपली आणि तिचे संगोपन केले. कलेचे संगोपन व संवर्धन करणे हे राष्ट्र कार्य असल्याचे ते म्हणाले कार्यक्रमात शिबिरार्थ्यांच्या वतीने सुनील शर्मा यांनी मनोगत व्यक्त केलं आपल्या मनोगतात हे नाट्य शिबिर यशस्वी झाल्यास सांगून ते म्हणाले, या शिबिराने स्थानिक नाट्य चळवळ निश्चित गतिमान होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिबिर संचालक प्रा तन्मय शेटगार यांनी केले तर मुकुंद धुताडमल यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते सहभागी शिबिरार्थ्यांना सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने प्रमाणपत्र वितरित करण्यात आली. कार्यक्रमास येथील ज्येष्ठ रंगकर्मी मिलिंद दुसे, विनोद जैतमहाल, निर्मळ, सुनील शर्मा यांच्यासह विविध नाट्य संस्थांचे कलावंत व नाट्यप्रेमी नागरिक उपस्थित होते.

## पान १ आणि ४ वरुन...

### राख, वाळूच्या सर्व ...

पैसे खाईल त्याला मातीत घातल्याशिवाय राहणार नाही. बीडचे पालकमंत्री झाल्यानंतर अजित पवार दुसऱ्यांदा बीडमध्ये आले आहेत. अजित पवार बीडमध्ये येत नसल्याच्या टीका अनेक जण करत होते. या टीका करणाऱ्यांना देखील त्यांनी उत्तर दिलं आहे. 'अजित पवार एक महिना झाला बीडमध्ये आला नाही असे काही जण म्हणाले. अरे पण मी एक महिना तिथे बसून बजेट करत होतो. सात लाख तीस हजार कोटी हा आकडा मला लिहून दाखवावा.'अशा शब्दात त्यांनी विरोधकांना झापलं.उपमुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले, 'मला शाल- हार घालू नका. मला शाल घालतात कागद तसाच असतो तो खाली पडतो तर हार घालताना कॅरीबॅग तिथेच पडतात. मी आता त्या कॅरी बॅग उचलतो. आताचे पुढारी हे पाया पडण्याच्या लायकीचे नाहीत. पाया पडले की उगाच लाचार झाल्यासारखे वाटते. - पाया पडण्यापेक्षा रामराम, नमस्कार असे म्हणा.' तसंच, 'प्रवक्त्याने तोलून मापून बोलावं. - कोणत्याही समाजाच्या किंवा पक्षाच्या भावना दुखवता कामा नये. आपण संयमाने बोलावे.', असे आवाहन त्यांनी पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना केले आहे. अजित पवारांनी युवकांना आवाहन केले आहे की, 'आजही आमचं वय झालं असलं तरी आम्ही नवीन नवीन शिकतो. रोज नवीन शिकता येते. पदाधिकाऱ्यांनी एकमेकांबाबत चांगली भावना ठेवा. याने याचा कार्यक्रम पाडला वगैरे वगैरे असं करू नका. असं कोणी कोणाचा कार्यक्रम पाडत नसतं. युवकांनो निर्व्यसनी रहा.बीडमध्ये विकासकामावरून देखील अजित पवार ठेकेदारावर संतापले. त्यांनी सांगितले की, 'काही ठिकाणी दर्जाहीन कामे सुरू आहेत. जर दर्जाहीन कामे केल्यास त्याला काळ्या यादीत टाकू. ठेकेदार अजित पवारांच्या जवळचा असला तरी त्याला काळ्या यादीत टाकणार आहे. बीडमधील लोकांनी माझ्याकडे फार अपेक्षा केल्या आहेत. अनेक भाग खूप पुढे गेलेत पण इथला कचरा देखील निघाला नाही. मी पुढच्यावेळी येताना मुक्कामासाठी येणार आहे. मी वेगवेगळ्या लोकांशी संवाद साधणार आहे. त्यांच्या सूचना घेणार आहे. चांगल्या सूचना आणि सल्ल्याचे स्वागत करणार असे अजित पवार यांनी सांगितले.

### तहसीलदाराच्या दालनासमोरच...

जमीन मिळवण्यासाठी आणि सर्वे नंबरची हद्द निश्चित करण्यासाठी पोलीस प्रोटेक्शन सह तहसीलदार यांना जमिनीच्या स्पॉटवर नेण्यात आले होते. प्रशासनाकडून मोजणी केलेल्या शेतीची पहाणी करण्याचे काम सुरू असतानाच यातीलच अशोक शिंदे या शेतकऱ्यांनी माझे अतिक्रमण नाही असे म्हणत तहसीलमध्ये घुसून तहसीलदारांच्या दालनासमोर पेट्रोल अंगावरओतून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी त्याला पेट्रोल वाचण्यापासून प्रयत्न केला. त्यामुळे तहसील कार्यालयातील अनुसूचित प्रकार टळला या शेतीच्या वादा संदर्भात तहसील कार्यालयामध्ये रात्री साडेआठ वाजेपर्यंत तहसीलदारांच्या दालनामध्ये यासंदर्भात चर्चा सुरू होती.

### देवराई वनप्रकल्पाची दुरावस्था...

पाऊल कौतुकाचा विषय होता. शहरापासून जवळ असल्याने बीडकर याठिकाणी सकाळी सायंकाळी फिरण्यासाठी जात होते. सुरूवातीला या प्रकल्पाकडे चांगले लक्ष दिल्याने प्रकल्प हिरवागार होता. मात्र मागील २-३ वर्षांपासून वनविभागाचे याकडे दुर्लक्ष झाले.सामाजिक कार्यकर्त्यांचा ओढा कमी झाल्याने देवराईची दुरावस्था होण्यास सुरुवात झाली. राज्यात सर्वात कमी वनक्षेत्र असलेल्या बीड जिल्ह्यात उभारलेली या वनराईचे नियोजना अभावी वाळवंट झाले. पहिले ३ वर्षे जिल्हा नियोजन योजनेंतर्गत पाण्यासाठी निधी देण्यात आला होता.त्यानंतर उद्योजक सुरेश कुटे आर्थिक अडचणीत आल्यानंतर त्यांनी प्रायोजिकत्व स्विकारलेले पाण्याचे टँकर बंद झाल्याने दिड वर्षांपासून देवराई पाण्याविना होती. जिल्हा प्रशासनाने जिल्हा नियोजन योजनेतुन निधी द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व सहका-यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेशरमांची झाडांची लागवड करत लक्ष्यवेधी आंदोलन करून जिल्हा प्रशासन व वनविभागाचे लक्ष्य वेधण्याचा प्रयत्न केला होता.

### मस्जिद बॉम्बस्फोट आरोपींवर...

पसरविण्यासाठी पवित्र मस्जिद मध्ये स्फोट घडविलेला आहे,व त्यामुळे पवित्र मस्जिदचे नुकसान झाले असुन पवित्र मस्जिदेची विटंबना झाली आहे.या बाबत अटक आरोपींनी पवित्र मस्जिद स्फोट करण्या अगोदर व्हि. डी.ओ.बनवुन सोशियल मिडीयावर टाकलेला आहे.या मागे असलेल्या मास्टरमाईंडला अटक करने देखील गर्जेचे आहे.म्हणुन सर्व संबंधितावर व मास्टरमाईंडवर दहशत विरोधी कायदा (UAPA Act. 1967) व राष्ट्रीय सुरक्षा कायदा (NSA Act.) अतंर्गत कार्यवाही करुन त्यांच्या विरुद्ध फासस्ट्रॅक कोर्टामध्ये प्रकरण चालवुन आरोपींना कडक शासन व दंड करण्यात यावे अशी मागणी उस्मानीय फाउंडेशन माजलगावच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे.तशा मागणीचे निवेदन माजलगाव मतदार संघाचे आ.प्रकाश सोळंके यांना देण्यात आले आहे आहे.

### आदित्य शिक्षण संस्थेचे ...

एक प्रकारचे अमूल्य योगदान आहे. रक्तदान करून आपण कोणाच्यातरी जीवनरक्षणासाठी मदत करू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने स्वतःहून पुढे येऊन रक्तदान करावे आणि या महान कार्यात आपला सहभाग नोंदवावा. 'रक्तदान, जीवनदान' ही संकल्पना आचरणात आणल्यास समाज निरोगी आणि सक्षम होईल. असे प्रतिपादन सीए. गिरिश गिल्डा यांनी व्यक्त केले.

### जिल्हा वाहतुक शाखेचा...

जिल्हा पोलीसांवर जनतेचा विश्वास वाढलेला दिसत आहे अशातच आज रोजी जिल्हा वाहतुक शाखेने मोटार वाहन कायद्या अंतर्गत परळी येथे संभाजीनगर पोलीस स्टेशनच्या अंतर्गत अप्पर पोलीस अधिक्षक सचिन यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष, संभाजीनगरचे पोलीस निरीक्षक धनंजय यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्यासोबत पोलीस हवालदार शांतीलाल, पोलीस हवालदार विष्णु, पोलीस नाईक आदिनाथ, पोलीस अंमलदार विश्वजित, चालक हवालदार संतोष व संभाजीनगरचे पोलीस अंमलदार दिलीप यांच्या सहकार्याने दुपारी ११ ते १ च्या दरम्यान परळी वै.उड्डाणपुल, एकमिनार चौक येथे विविध कलमांतर्गत लायसन्स नसणे, विमा नसणे, काळी काच, नो पार्किंग, ट्रिपलसीट या सदराखाली एकुण ९५ केसेस व दंड ६६ हजार रुपये करण्यात आला व रोख ६ हजार ८०० रुपये दंड वसुल केला. या दरम्यान पोलीस स्टेशन गंगाखेड गु.र.नं.४५/२४ कल म ३७९ अंतर्गत चोरीस गेलेली मोटारसायकल क्र.एम.एच.२२ बीबी ३२६१ हे वाहन आरोपी नामे शेख मोहम्मद शेख नबीसाब बागवान,रा.वैजवाडी, ता.परळी सह पकडली व पोलीस स्टेशन संभाजीनगर यांच्या स्वाधीन केले.

### राजेगाव ग्रोटेक ऑरगॅनिक...

मावेनासा झाला आहे. या उद्घाटन प्रसंगी बाहेरगावचे नागरिक गावातील प्रतिष्ठित नागरिक तरुण मंडळ व ग्रोटेक कंपनीचे संचालक ड. बालासाहेब गीते, अमर मेटे, शुभम देवकते, अमित राऊत उपस्थित होते सदरील संचालकाचे आभार शेतकऱ्यांनी मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र गीते (शिक्षक) यांनी केले.

### बळीराजाचे आर्थिक जीवन...

ट्रॅक्टर खर्च खुरपणी फवारणी मळणी यंत्र मजुरी दैनंदिन खर्च वाढल्यामुळे व शेतीमालाला भाव नसल्यामुळे शेती परवडत नाही .उत्पादनातून खर्च निघणे शक्य नाही, त्यामुळे सर्व बाजूने शेतकऱ्याला शासनाने आधार देणे काळाची गरज आहे. निष्क्रिय केंद्र व राज्यातील सरकार शेतकऱ्याला संपवण्याचे षडयंत्र रचित असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला.

### सय्यद अहाद वसीम...

वयाच्या ९ व्या वर्षी दिवसभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंब न घेता काटेकोरपणे असणारे पवित्र रमजान महिन्याचे २९ उपवास (रोजा) पुर्ण केले, त्याबद्दल नातेवाईकडून व मित्र परिवाराकडून अभिनंदन होत आहे.

### शेख सुलतान यांनी...

त्यांच्यासाठी घेतलेल्या श्रमाचे चीज केले आहे. रमज़ान ईद निमित्ताने हे तिन्ही बहीण-भाऊ औरंगाबाद येथील घरी आले असता त्यांचे पीर ओ मुर्शिद हज़रत सय्यद रौशन मियाँ (हैदराबाद) यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते तिघांचेही अभिनंदन करून सत्कार करण्यात आले. तसेच यापुढेही त्यांनी अनेक यशस्वी शिखरे लिलया पादाक्रांत करावी अशा शुभेच्छा देण्यात आल्या. या तिन्ही भावंडांनी दाखवून दिले की, पालक जागरूक असले आणि जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या बळावर शिक्षणाची कास घट्ट धरली तर परिस्थिती कशीही असो आपल्याला हवे ते साध्य करता येते. यावेळी मुलामुलींचे मामू मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़-शेख कौसर जहाँ (मामू-मुमानी), नईम अहेमद (मामू), शेख फुरखान, शेख वासेख, शेख लईख, मुहम्मद अली यांची उपस्थिती होती.

# अर्धमसल्यातील त्या मस्जिद मध्ये हिंदू-मुस्लिम बांधवांची इफ्तार पार्टी

## खा.बजरंग सोनवणे, बदामराव पंडित बाबुराव पोटभरे उपस्थित

सरकार नेटवर्क

गेवराई : गेवराई तालुक्यातील अर्धमसला येथील मक्का मस्जिद मध्ये समाजकंटकानी जिलेटिनच्या कांड्यांचा स्फोट घडवल्यानंतर पोलीस प्रशासनासह अनेक नेत्यांनी गावाला भेट दिली. मात्र सायंकाळी याच मस्जिद मध्ये हिंदू मुस्लिम बांधवांनी सर्व धर्मीय इफ्तार पार्टीचे आयोजन करून आपल्या ऐक्याचे दर्शन घडवले. या इफ्तार पार्टीस खा बजरंग सोनवणे, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, सामाजिक कार्यकर्ते बाबुराव पोटभरे यांनीही उपस्थिती लावली. गेवराई तालुक्यातील अर्धमसला येथील मक्का मस्जिद मध्ये दिनांक २९ मार्च रोजी उरूस सुरू असताना काही तरुणांची एकमेकांसोबत बाचाबाची आणि शिवीगाळ करण्यात आली. यानंतर रात्री अडीच वाजेच्या सुमारास गावातील दोघांनी या मस्जिद मध्ये जिलेटीनच्या कांड्यांचा स्पोर्ट करून धार्मिक स्थळाला इजा पोहोचवली. यामुळे दिनांक ३० मार्च रोजी दिवसभर तालुका भरात तणावाचे वातावरण होते. घटनेची माहिती मिळताच अनेक पोलीस अधिकारी राजकीय नेते यांनी अर्धमसला येथे भेट देऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. गेवराई शहरासह ग्रामीण भागातील बाजारपेठेच्या गावामध्ये मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने बंदचे आवाहन करण्यात आले होते. दरम्यान या प्रकरणात गावातीलच दोन तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. सर्वांनी संयम राखून कुठल्याही अफवांना बळी न पडता कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी केले. दरम्यान दिनांक ३० मार्च २०२३ रोजी सायंकाळी रमजान महिन्यानिमित्त याच मस्जिद मध्ये हिंदू मुस्लिम बांधवांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. यावेळी खासदार बजरंग सोनवणे, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, सामाजिक कार्यकर्ते बाबुराव पोटभरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांच्यासह अनेक राजकीय पक्ष व संघटनाचे पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### या घटनेतील मास्टर माइंड शोधा : बाबुराव पोटभरे

**अर्धमसला येथील मस्जिद मध्ये जो स्फोट करण्यात आला, त्या स्फोट प्रकरणातील दोन आरोपी अटक झाले असते तरी त्यांच्या मागे मास्टर माईंड कोण आहे? याचा शोध पोलिसांनी घ्यावा. जोपर्यंत मास्टर माईंड शोधला जात नाही तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही, अशी मागणी आणि इशारा सामाजिक कार्यकर्ते बाबुराव पोटभरे यांनी दिला आहे. त्यांच्या समवेत माजी सभापती राजेश साळवे, नवनाथ धाईजे, शेख बाबा, नूर आत्तार, भीमराव टाकणखार, भैया प्रधान आदींची उपस्थिती होती.**




# हर्षवर्धन,रिचा, रेश्मा एमबीबीएस परीक्षेत उत्तीर्ण!

## वरपगावच्या नावलौकीकतेत पडली भर

सरकार नेटवर्क

केज : केज तालुक्यातील वरपगाव येथील हर्षवर्धन प्रवीण देशमुख यांचे एमबीबीएस शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूर येथे झाले तसेस रिचा बालासाहेब देशमुख हिचे एमबीबीएस शिक्षण शासकीय मेडिकल कॉलेज संभाजीनगर येथे झाले तसेच रेश्मा संतोष देशमुख हिचे एमबीबीएस शिक्षण विलासराव देशमुख शासकीय मेडिकल कॉलेज लातुर येथे झाले यांनी एमबीबीएस परीक्षेचा अंतीम निकालामध्ये उत्तीर्ण होऊन केज तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात वरपगावच्या नावलौकीकतेत भर पाडली आहे डॉ. हर्षवर्धन हा प्रविण मानीकराव देशमुख वसंत विद्यालयाचे मुख्याध्यापक यांचा मुलगा आहे.तसेच रेश्मा ही संतोष उद्धव देशमुख यांची मुलगी असून तीचे वडील संतोष कृषी सेवा केंद्र केजचे संचालक आहेत तसेच डॉ रिता ही प्रसिद्ध शैक्षणिक साहित्य विक्रेते बालासाहेब जालिंदर देशमुख यांची मुलगी आहे अशी ओळख यांच्या आई वडीलांची आहे व अशा कठीण परिस्थितीत सर्वसामान्य माणसाचे मुल, मुली एमबीबीएस होणे म्हणजे या पाठीमागे खुप मोठा संघर्ष आहे कारण आताच्या काळात करोडपती चे मुल एमबीबीएस होतात परंतु सर्वसामान्यांचे मुले एमबीबीएस होणे म्हणजे सोपी गोष्ट नाही अशा कठीण परिस्थितीत सर्वसामान्य घरातील वरपगाव येथील हर्षवर्धन, रेश्मा,रिचा यांनी एमबीबीएस परीक्षेत उत्तीर्ण होऊन यश मिळवले व वरपगावची मान उंचावली त्याबद्दल वरपगाव ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच ड.बाबुरावजी देशमुख यांनी समस्त ग्रामपंचायतीच्या वतीने व गावकऱ्यांच्या वतीने कौतुकास्पद असणाऱ्या तीनही भुमीपुत्राचे कौतुक व अभिनंदन करण्यात केले व येणाऱ्या काळात डॉ. रेश्मा, डॉ.रिचा, डॉ.हर्षवर्धन या तीनही भुमीपुत्रा कडुन सामान्य जनतेची सेवा घडावी अशी अपेक्षा व्यक्त केली.







# जन सुरक्षा विधेयक रद्द करा आझाद क्रांती सेनेची मागणी

सरकार नेटवर्क

माजलगाव - दि.२९ मार्च २०२५ रोजी आझाद क्रांती सेनेच्या वतीने तहसीलदार मार्फत श्री. जितेंद्र भोळे, सचिव (१) (कार्यभार),महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन,मुंबई यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे माजलगाव तहसील कार्यालयाच्या समोर तीव्र निदर्शने करून जनक सुरक्षा विधेयक कायद्याची होळी करण्यात आली सविस्तर वृत्तांत असे की सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भंग करणारे असून, घटनेच्या मुलभूत अधिकारांविरोधात असल्याने सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३, ज्याअंतर्गत व्यक्ती व संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न केला जात आहे, हे विधेयक अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे आणि भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ मध्ये दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे आहे. हे विधेयक अत्यंत व्यापक आणि अस्पष्ट व्याख्या वापरून व्यक्ती व संघटनांवर कठोर निर्बंध लावण्याचा प्रयत्न करत असून, त्याचा गैरवापर राजकीय, सामाजिक आणि विचारसरणीच्या आधारे दडपशाही करण्यासाठी केला जाऊ शकतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे कोणत्याही लोकशाही देशाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असून, त्यावर कोणत्याही प्रकारची बंधने लादणे हा लोकशाही मूल्यांचा आणि नागरिकांच्या हक्कांचा अवमान आहे.



# जीवाची वाडी येथे गुढी पाडव्या निमित्त कीर्तन संपन्न

सरकार नेटवर्क

केज : आप्पाराव सारूक दि.३० रोजीरूढी परंपरा नुसार मूळ जीवाची वाडी येथील रहिवासी व पंढरपूर येथे कायम वास्तव्यस असणारे ह.भ.प.श्री.कृष्णा भागवत चौरे, महाराज पंढरपूर,यांचे आज दि.३०मार्च-२०२५ रोजी दुपारी १ते०३:०० वाजता या वेळेत कीर्तनाचे आयोजन ग्रामस्थ जीवाचीवाडी कर यांनी केले. कीर्तन सेवा रुपीअभंग।।रूप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी बहुत सुखदुताची जोडी म्हणून विठ्ठल आवडी तोहा विठ्ठल भरवा तोहा माधव भरवा सर्व सुखाचे आगर बापरूकमा देवीवर।। तसेच गुढीपाडव्यानिमित्त काला व श्रीकृष्णाच्या खोडी लिला यांचे विविध दृष्टांत देत किर्तन संपन्न झाले कार्यक्रमास टाळकरी, विणेकरी, मृदंगाचार्य, गायक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शिवाजीनगर पोलीस ठाणे कडुन अभिलेखावरील सराईत गुन्हेगारावर हद्दपारीची कारवाई

सरकार नेटवर्क

बीड : शिवाजीनगर पोलीस ठाणे अभिलेखावर मोटार सायकल चोरी, वाळु चोरी, वेश्या व्यवसाय चालवणे प्रकरणी एकुण ०४ गुन्हे दाखल असलेला सराईत गुन्हेगार नामे राम लक्ष्मण लांडगे वय २६ वर्ष रा. गोबीद नगर, धानोरा रोड, बोड हा धोकादायक व सराईत गुन्हेगार असल्याने त्याला बीड जिल्ह्या सिमा हद्दीतुन दोन वर्षाकरीता हद्दपार करणेकामी मुंबई पोलोस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) प्रमाणे पोलीस निरीक्षक श्री. एम.बी. खेडकर, शिवाजीनगर पोलीस ठाणे, बीड यांनी हद्दपार प्रस्ताव तयार करुन सदरचा प्रस्ताव मा. पोलीस अधीक्षक साहेब, बीड यांचे मार्फतीने मा. उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, उपविभाग बीड यांना सादर केलेला होता. सदर प्रस्तावा वरुन मा. कविता जाधव मॅडम, उपविभागीय दंडाधिकारी, उपविभाग बीड यांनी सराईत गुन्हेगार नामे राम लक्ष्मण लांडगे वय २६ वर्षे रा. गोवींद नगर, धानोरा रोड, बीड यास मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) प्रमाणे बीड जिल्हा सिमा हद्दीतुन एक वर्षाकरीता हद्दपार करण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर आदेशाप्रमाणे इसम नामे राम लक्ष्मण लांडगे वय २६ वर्षे रा. गोवीद नगर, धानोरा रोड, बीड हा दिनांक २९/०३/२०२५ रोजी गोंदी पोलीस ठाणे जि. जालना हद्दीत राहणारे त्याचे नातेवाईक सुरेश सुभाष जगताप रा. शहागड ता.अंबड जि. जालना यांचेकडे राहणेस गेलेला आहे. सदर इसमास एक वर्षाकरीता पुर्व परवानगी शिवाय बीड जिल्हा हद्दीत येण्यास मनाई आहे. सदरचा इसम बीड जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजीकच्या पोलीस ठाणेला माहिती द्यावी. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित कौवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विश्वंभर गोल्डे साहेब यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. मारोती खेडकर, पोह/२१३० परजने, पोह/१६६४ आघाव, पोह/१८१७ नाटकर, पोअं./९८३ सारणीकर यांनी केलेली आहे.



# कालिकादेवी महाविद्यालयात कै. सौ. केशरबाई क्षीरसागर यांची जयंती साजरी

सरकार नेटवर्क

शिरूर का. - येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कै. सौ.केशरबाई क्षीरसागर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे, डॉ. नवनाथ पवळे, डॉ.रमेश लांडगे, डा.रमेश लाहोटी,प्रा. घाडगे आर. बी,,,रा.से.यो विभाग प्रमुख डॉ.अशोक घोळवे, डॉ.श्याम सानप , प्रा. डा. सुधीर येवले, प्रा. डॉ. मुळे पी.एम, प्रा. डा.ज्ञानेश्वर येवले,, प्रा. डॉ.विठ्ठल गुंडे, डॉ. चौधर यू.एन,डॉ. धम्मपाल घुंबरे ,डॉ.चेतना डोंगळीकर , प्रा. सय्यद अफरोज,कार्यालयीन अधिक्षक श्री. शेळके एन .ए ग्रंथपाल प्रा.संजय जोगदंड श्री .उमाकांत खेडकर, श्री बाळू पवार तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी,विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.



# जि. प. प्रा. शाळा कुक्कडगाव शाळेतून अनिकेत आठवले नवोदय विद्यालयास पात्र

सरकार नेटवर्क

बीड - तालुक्यातील कुक्कडगाव जि. प. प्रा. शाळेचा इयत्ता पाचवीचा विदयार्थी अनिकेत नितीन आठवले जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाला असून तो नवोदय विद्यालय प्रवेशास पहिल्याच निवड यादीत पात्र झालाआहे. या यशाबद्दल आणि त्याच्या वाढदिवसानिमित्त शाळेच्या आणि ग्रामस्थांच्या वतीने शुभेच्छा देऊन अभिनंदन करण्यात आले. नितीन आठवले यांची मुलगीही याच शाळेतून नवोदय विद्यालयास पात्र झाली होती. आपल्या दोन्ही पाल्यांना चांगले शिक्षण देऊन त्यांच्या पंखाना बळ देणाऱ्या नितीन आणि महानंदाआठवले या पालकांचेही यावेळी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सतीश वटारे, सहशिक्षक जालिंदर गाडे, श्रीमती शोभा कुडके, कौशल्या राऊत,विजया बैरागी, पपीता चव्हाण, संगीता कुपकर अदि शिक्षकांसह, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नंदकुमार शिंदे, सर्व सदस्य, जेष्ठ नागरिक,पालक, विध्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# रोटरीने मिडटाऊन कडून होणार बीड नगरीमध्ये हार्दिक स्वागत

सरकार नेटवर्क

बीड - रोटरी ही आंतरराष्ट्रीय सामाजिक संघटना आहे १९०५ मध्ये स्थापन झालेली संघटना बीडमध्ये गेल्या ३४ वर्षापासून वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या भागांमध्ये अनेक समाज उपयोगी काम करते जसे की पर्यावरण ,माता व बाल संगोपन , स्वच्छता व पाणी व्यवस्थापन ,साक्षरता, शांतता व इतर अनेक क्षेत्रांमध्ये काम करते. बीड शहराच्या चारही दिशेला रोटरीने स्वागत बोर्ड लावलेले आहेत बोर्डच्या एका बाजूला स्वागत व दुसऱ्या बाजूला रोटरी ची चतुरंग जीवन दृष्टी म्हणजे आपण समाजामध्ये कसे राहिले पाहिजे कसे बोलले पाहिजे आणि याचे फायदे काय होतात याचा उल्लेख केला आहे,बोर्डचे अनावरण डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ.सुरेश साबू, असिस्टंट गव्हर्नर रो.गणेश मुळे,वाहतूक शाखेचे पोलीस अधीक्षक सानप साहेब, तसेच जाधवर साहेब, बीड ग्रामीणचे बंटेवाड साहेब, महाराष्ट्र राज्य उप प्रादेशिक अधिकारी बालाजी धनवे साहेब, सराफा असोसिएशनचे सचिव रवी आहेर , तसेच डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी डॉ. नितीन खंडेलवाल, रो.विवेक मनियार डॉ. सुमित्रा गादिया, यांच्या हस्ते करण्यात आले या बोर्ड साठी दहिवाळ सुवर्णकारचे रो. जनार्दन दहिवाळ, कैलास ज्वेलर्स चे रो.कैलास मैड, रो.डॉ. शिवाजीराव देशमाने तसेच श्री मोटरचे नितीन गोपन यांचे सहकार्य लाभले. यावेळी अध्यक्ष.रो. इंजि. नितीन गोपन, सचिव डॉ.निलेश जगदाळे,,पि .डी. जी. हरीश मोटवानी, प्रोजेक्ट चेअरमन रो. इंजि. राहुल बोरा, रो. डॉ. प्रकाश कोंका, रो. सूर्यकांत महाजन,रो.अनिल कुकडेजा रो. इंजि.अमोल तळेकर, रो .प्रा.नितीन भोसले रो.अभिजीतसिंह ठाकुर,रो. लक्ष्मण मळेकर, रो.संतोष पडोळे, रो.डॉ. शिवाजी देशमाने, रो.जनार्दन दहिवाळ, ,रो.सुरेश बुद्धदेव, रो.संजय गुप्ता,रो. मनोज ठिगळे,रो. बाबासाहेब कुडके,रो. गणेश वाघ, रो.सर्वज्ञ जोशी व इंजिनीयर सातपुते साहेब हेही उपस्थित होते या बोर्डमुळे रोटरीची ओळख सर्वांना होणार आहे आणि या उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.




# पिंपळनेरच्या आदिती पेंढारेचे सुयश

सरकार नेटवर्क

बीड - तालुक्यातील पिंपळनेर येथील रहिवासी व बीड येथील शिवाजी विद्यालयाची विद्यार्थीनी आदिती विनोद पेंढारे हिने नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत सुयश प्राप्त केले असून तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. बीड येथील शिवाजी विद्यालयात पाचवी वर्गात शिक्षण घेत असलेल्या अदिती पेंढारे हिला नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठी गणेश कदम या शिक्षकाने बहुमोल असे मार्गदर्शन केले ते चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले असून नवोदय विद्यालयात प्रवेश तिने निश्चित केला आहे. तिच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक आर. आर. वाघमारे, शिक्षिका जे.एन. काकडे, शिक्षक ए. बी. देवगुडे सह दीपक पेंढारे, पांडुरंग पेंढारे, अरुण पेंढारे, देविदास पेंढारे, विनोद पेंढारे, गोविंद पेंढारे सह आदींनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## सय्यद अहाद वसीम या ९ वर्षीय बालकाचें रमजान महिन्याचे २९ उपवास (रोजा ) पूर्ण



बीड : मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे असतात. परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. अश्याच प्रकारे बीड येथिल फहीम इनामदार यांचे भाचे व खर्डा येथे स्थायिक असलेले सय्यद वसीम सिकंदर यांचे चिरंजीव सय्यद अहाद वसीम याने आपल्या » पान २ वर

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका कधी घेणार
# खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत उपस्थित केला प्रश्न

बीड : महाराष्ट्र राज्यामधे गेल्या ३ वर्षापासून ग्रामपंचायत, नगर पंचायत, नगर परिषद, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुका झालेल्या नाहीत. या सर्व संस्था प्रशासकांच्या नेतृत्वाखाली काम करीत आहेत. प्रशासकांचा ग्रामीण भागातील सर्वदूर थेट संपर्क नसल्याने ग्रामीण भागातील विकास थांबलेला आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका कधी घेणार ? केंद्र सरकार काही हस्तक्षेप करणार आहे का ? असा सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत उपस्थित केला.

दिल्ली येथे सुरू असलेल्या लोकसभेच्या अधिवेशनात खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी पुढे बोलताना खा.सोनवणे म्हणाले, सन १९९२ मधे संसदेने मंजूर केलेल्या व २४ एप्रिल १९९३ रोजी लागू झालेल्या ७३ व्या घटना दुरुस्ती कायद्यानुसार पंचायत राज व्यवस्था स्थापन करण्यात आली. पंचायत राज संस्थांचे अधिकार व जबाबदारी निश्चित करण्यात आले. मी बीड लोकसभा मतदारसंघातून निवडून आलो आहे. मला ३०-३२ वर्ष सलग पंचायत राज व्यवस्थेमधील वेग-वेगळ्या संस्थामधे काम करण्याचा अनुभव आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिला परिषदमधे काम करत असताना ग्रामीण भागाच्या विकासामधे पंचायत राज संस्थांचे असलेले स्थान महत्वपूर्ण आहे. मात्र महाराष्ट्र राज्यामधे गेल्या ३ वर्षापासून ग्रामपंचायत, नगर पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुका झालेल्या नाहीत. या सर्व संस्था प्रशासकांच्या नेतृत्वाखाली काम करीत आहेत. लोकनियुक्त मंडळ नसल्यामुळे सरकार नियुक्त प्रशासक काम करीत आहेत. प्रशासकांचा ग्रामीण भागातील सर्वदूर थेट संपर्क नसतो. त्याना सर्व समस्या माहित नसतात. त्यामुळे राज्यातील ग्रामीण भागातील विकास थांबलेला आहे. संसदेने सर्व पंचायत राज संस्थांच्या निवडणुका ५ वर्ष पूर्ण होण्यापूर्वी घेण्यात याव्यात, असा कायदा पारित केलेला आहे. परंतू, सर्वोच्च न्यायालयामधे एक प्रकरण प्रलंबित असल्यामुळे राज्य निवडणुक आयोगाकडून निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात येत नाही. हे पंचायत राज संस्थांचे अपयश आहे. लवकरात लवकर या निवडणुका घेण्यासाठी सरकारने हस्तक्षेप करावा. लवकर निवडणुका होण्यासाठी केंद्र सरकार काय करणार आहे?, असा सवाल उपस्थित केला.



### महिला आरक्षणा बाबतही चर्चा

स्थानिक स्वराज्य संस्थांमधे महिलांचे प्रतिनिधित्व वाढविणे व अधिकात अधिक महिलांना निर्णय प्रक्रियेमधे सामील करुन घेण्याच्या उद्देशाने पंचायत राज संस्थांमधे महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा कायदा १९९२ मधे संसदेमधे मंजूर करण्यात आला व दि.२० एप्रिल १९९३ पासून हा कायदा अमलात आला. तेंव्हापासून ग्रामीण भागामधे स्थानिक स्वराज्य संस्थामधील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर पंचायत आणि नगर पालिकामधे महिला प्रभावी काम करताना दिसत आहेत. याचे चांगले परिणाम दिसून येत आहेत ही समाधानाची बाब आहे. पंचायत राज संस्थांच्या अंतर्गत सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांमधे महिला स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतील व अधिक प्रभावाने काम करतील यासाठी सरकार काय योजना करणार आहे ? असा प्रश्न खा. सोनवणे यांनी केला.

## आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते परळीत शिवसेवा हॉस्पिटलचे शुभारंभ संपन्न

परळी वैद्यनाथ : शहरातील शिवसेवा हॉस्पिटल, कराड कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड भागात गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर भव्य दिव्य होत असलेल्या शिवसेवा (जनरल फिजीशीयन व सर्व रोग उपचार) हॉस्पिटलचा माजी मंत्री तथा परळीचे आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते शुभारंभ पार पडला. यावेळी परळीतील सर्व मान्यवरांची उपस्थिती होती. आ. धनंजय मुंडे यांचे डॉ. श्रेयस कराड यांनी स्वागत केले. दरम्यान परळी वैजनाथ हे आता हॉस्पिटलचे हब बनत चालले आहे. दिवसेंदिवस नवनवीन हॉस्पिटल परळीत सुरू होत आहेत. शिवसेवा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना चांगल्या सुविधा मिळतील अशी अपेक्षा आ. धनंजय मुंडे यांनी व्यक्त करून हॉस्पिटल च्या सर्व



डॉक्टरांना शुभेच्छा दिल्या. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक श्री प्रभू वैद्यनाथाचे पावन नगरी मध्ये गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर डॉ.श्रेयस कराड यांच्या शिवसेवा हॉस्पिटलचा शहरातील शिवसेवा हॉस्पिटल, कराड कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड परळी वैजनाथ येथे परळीचे आ.धनंजयजी मुंडे यांच्या शुभ हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव रमाई नगर नाळवंडी ची कार्यकारणी जाहीर

बीड : दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महामानव,भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार विश्वरत्न,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विविध आणि आदर्श सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरा करण्याचा निर्णय आज प्रज्ञासूर्य मित्र मंडळाने हाती घेतला आहे.या जयंतीच्या अनुषंगाने काही पदाधिकाऱ्यांची कार्यकरणी जाहीर करून निवड करण्यात आली.ही कार्यकारणी जाहीर करत असताना रमाई नगर परिसरातील जेष्ट,युवक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रज्ञासूर्य मित्र मंडळाच्या सदस्याच्या नेतृत्वाखाली बैठक पार पाडून पुढील प्रमाणे कार्यकारणी जाहीर करण्यात आली.या वेळी अध्यक्ष पदी युवा पत्रकार अमोल जाधव,उपाध्यक्ष पदी रोहन जाधव,सचिव पदी रोशन कानडे,कोषाध्यक्ष पदी अनिल लांडगे यांची सर्वानुमते निवड करून त्यांचे स्वागत करून पुढील वाटचालीस सुभेच्छा दिल्या.या वेळी या प्रसंगी उपस्थित युवा नेते मसु जाधव,अजय जाधव,किरण जाधव,प्रेम कोकाटे,तेजस जाधव,सागर जाधव,सचिन कानडे,अशोक कानडे,गणेश कानडे,आदित्य जाधव,आदित्य जाधव,त्याच बरोबर अनेक जेष्ट या ठिकाणी उपस्थित होते.





## वक़्फ अमेंडमेंट बील विरोधात लोकसेनाचे होणारे आंदोलन स्थगित
### अजित पवार यांच्या दौऱ्यामुळे पोलिसांनी नाकारली परवानगी : इलियास इनामदार

बीड : केंद्रातील भाजपा मोदी सरकार मुस्लिम विरोधी वक़्फ कायदा २०२४ संसदेत आणणार आहे या कायदयाचा विरोध दर्शवन्यासाठी लोक सेना संघटनेच्या वतीने लोकसेना प्रमुख ड. प्रा. इलियास इनामदार यांच्या नेतृत्वाखाली दि.०२/०४/२०२५ रोजी आंदोलन होणार होते. व पुढे जिल्हाधिकारी कार्यालय बीडवर बेमुदत उपोषणाला बसणार होते. हा आंदोलन उपोषण शांततेत व लोकशाही मार्गाने होणार होता. रहदारीस कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची लोक सेना संघटनेच्या वतीने हमी देण्यात आली होती. तरी ही पोलिस प्रशासनाने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीड जिल्हा दौ-यावर येत असल्याने लोक सेना संघटनेला परवानगी दिली नाही. पोलिस प्रशासनने एका मंत्रीच्या दौ-यामुळे आम्हाला आमच्या संवैधानिक हक़्कापासुन वंचित ठेवल्याने तमाम मुस्लिम बांधवांच्या भावना दुखावले गेल्यामुळे लोक सेना या घटनेचा जाहिर निषेध करत असुन आजचा होणारा आंदोलन स्थगित केला आहे. असे लोकसेना प्रमुख प्रा. इलियास इनामदार यांनी जाहिर करत आहे.



## सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाईसाठी निदर्शने : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश : बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील अर्धमसला गावातील मशिदीमध्ये रमजान ईदच्या पुर्वसंध्येला आणि गुढीपाडव्याच्या दिवशी समाजकंटकांनी मस्जिदच्या आतील भागात जिलेटीनच्या कांड्यांनी स्फोट घडवून आणला. स्फोट घडवून आणलेल्या ठिकाणी मोठा खड्डा पडला असून भिंतीला तडे गेले आहेत, खिडक्या, दरवाजे,पंखे तुटून पडले आहेत.या घटनेने जिल्हा हादरला असुन संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे .या घटनेचा सर्व स्तरातून निषेध होऊ लागला असुन स्फोट घडवुन दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने पुर्व नियोजित कट करून मुस्लिम समाजाच्या प्रार्थना स्थळाचे नुकसान करत धार्मिक भावना दुखावणा-या समाजकंटकांना कठोरात कठोर शासन करण्यात यावे या मागणीसाठी आज दि.१ एप्रिल मंगळवार रोजी सकाळी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील सर्व समाजबांधवांनी एकत्र येऊन गावाच्या मुख्य प्रवेशद्वारावर स्फोट घडवणा-या समाजकंटकांवर कठोर कारवाई करा, हम सब एक है, हिंदू -मुस्लिम भाई भाई अशी घोषणाबाजी करत काळे झेंडे दाखवत तिव्र निदर्शने करण्यात आली. याचवेळी गेवराई तालुक्यातील पाचेगाव येथील कानिफनाथ मंदिरावर काही लोकांनी हिरवे झेंडे लावून तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागण्याचे निवेदन पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना देण्यात आले.



## श्री स्वामी समर्थ प्रगट दिनानिमित्त गेवराई शहरातून सवाद्य भव्य मिरवणूक






गेवराई : श्री स्वामी समर्थ यांच्या प्रगट दिनानिमित्त गेवराई शहरात श्री स्वामी समर्थ यांच्या प्रतिमेची रथातून तसेच पालखीतून सवाद्य भव्य मिरवणूक काढण्यात आली. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी श्री स्वामी समर्थ यांच्या पालखीचे दर्शन घेतले. भगव्या ध्वजासह माता-भगिनी मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाल्या होत्या. श्री स्वामी समर्थ यांचा प्रगट दिन असल्याने दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित गेवराई शहरातील भवानीनगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र पासून पंचायत समिती कॉर्नर, मोंढा नाका, मेन रोड, शास्त्री चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, भगवान नगर या मार्गाने श्री स्वामी समर्थ यांच्या प्रतिमेची रथ आणि पालखीतून वाजत गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूक मार्गावर महिलांनी आपल्या घरासमोर रांगोळ्या काढल्या. शिवसेनेचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, युवानेते रोहित पंडित यांनी मिरवणुकीत उपस्थित राहून श्री स्वामी समर्थांच्या पालखीचे दर्शन घेतले. या मिरवणुकीत श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र गेवराईच्या केंद्र निरीक्षक प्रतिनिधी सौ स्वरूपाताई रोहित पंडित, केंद्र प्रतिनिधी दादा अंभोरे यांच्यासह शहरातील महिला व पुरुष भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## राजेगाव ग्रोटेक ऑरगॅनिक शुगर इंडस्ट्रीज चा भूमिपूजन सोहळा




केज :तालुक्यातील राजेगाव सर्वे नंबर ४९ अ ,५० आ येथे ह .भ .प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरी व शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉक्टर ज्योतीताई मेटे यांच्या शुभहस्ते भूमिपूजन सोहळा संपन्न झाला. यावेळी पंचक्रोशीतील शेतकरी हजर होते. राजेगाव सारख्या छोट्या गावांमध्ये उद्योग उभा करून गावातील तरुण उद्योग धंद्यासाठी, नोकरीसाठी बाहेरगावी जात होते ते प्रमाण कमी होईल व गावातील कुशल तसेच गावात उद्योग उभा करून गावातील तरुणांना रोजगार निर्मिती केल्याबद्दल शेतकरी व तरुणांमध्ये आनंदाचे वातावरण होते. शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सदरील ग्रोटेक शुगर इंडस्ट्रीज मध्ये गुळ ,साखर अशी उत्पादने घेतली जातील व परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस तोडणी साठी ज्या अडचणी येत होत्या कारखाना जवळ नसल्यामुळे वाहतूक , मजुर इत्यादी समस्या भेडसावत होत्या आता राजेगाव ग्रोटेक शुगर इंडस्ट्रीज चे भूमिपूजन झाल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या गगनात आनंद » पान २ वर

## शेख सुलतान यांनी शुन्यातून येत तिन्ही मुलांना केले उच्च शिक्षीत



बीड : मूळचे अहेमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात असलेल्या चिचोंडी शिराळ येथील रहिवासी, बीड शहराचे जावई आणि गेल्या ३२ वर्षांपासून औरंगाबाद येथे स्थायिक झालेले शेख सुलतान याक़ूब यांनी अक्षरशः शून्यातून पुढे येत आपल्या तिन्ही मुलांना उच्चशिक्षित केले. यात मोठी मुलगी शेख मुहम्मदी सुलतान (नागपूर) हिने एम. फार्म पर्यंत विशेष प्राविण्याने शिक्षण घेत फार्मसी ऑफिसर पदापर्यंत झेप घेतली. (तिचे इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण बीड शहरातील छत्रपती शाहू महाराज प्राथमिक विद्यालयात आजोळी झाले). मुलगा शेख ज़ाफ़र सुलतान (गोंदिया) हा एम.एस.सी.सी.इ. पर्यंत शिक्षण घेऊन एम्ब्रीयोलॉजिस्ट (भ्रूण शास्त्रज्ञ) झाला तर लहान मुलगी शेख इरम सुलतान (पुणे) हि पी.बी.एस.सी. पर्यंत चे शिक्षण घेऊन ट्रान्स प्लांट नर्स झाली आहे. या तिघांनीही मेहनत आणि चिकाटी च्या बळावर गरुड झेप घेऊन आई-वडिलांनी » पान २ वर

## बळीराजाचे आर्थिक जीवन भाजपच्या केंद्र व राज्यातील सरकारने उध्वस्त केले : वसंत मुंडे

परळी : केंद्रात व राज्यात आरएसएसच्या विचारधारेचे भारतीय जनता पार्टीचे सरकार सत्तेवर असून संपूर्णपणे शेतीमालाचे भाव हमीभावा पेक्षा कमी करून शेतकऱ्याला आर्थिक कोंडीत टाकून बळीराजाचे स्वप्न उत्पन्न दुप्पट करण्याचे देखावा करून शेतकरी आर्थिक संकटात अडकविण्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. आपल्या देशामध्ये खरीप रब्बीचे शेतातीलाचे उत्पन्न तयार झाले की परदेशातून सर्व प्रकारचा शेतीमाल ठराविक टक्केवारी देणाऱ्या व्यापाऱ्यामार्फत मागून घेऊन संपूर्ण देशातील शेतकऱ्याच्या शेतीमालाचे भाव पाडून शेतकऱ्याचे जीवन उध्वस्त करण्याचा आरएसएस विचारधारेच्या केंद्रात व राज्यातील सरकारचा अजिंठा आहे. शेतीमाल परदेशातून आयात करताना आर एस एस बीजेपीच्या व्यापाऱ्याकडून अमेरिका ब्राझील अर्जेंटिना चीन या देशात सोयाबीनचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर होते. भारत देशातील सोयाबीन ची मागणी व पुरवठा आणि उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा परिणाम सोयाबीनच्या कापूस इतर शेतीमालाच्या किंमतीवर होत असतो. सरकारच्या चुकीच्या आयात निर्यात धोरणामुळे शेतीमालाचे भाव नसल्यामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या चिंताजनक असून संपूर्ण शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यापुढे आर्थिक संकट उभे राहत असल्यामुळे आत्महत्या वाढत आहेत . शेतकऱ्याच्या दैनंदिन कुटुंबाचा खर्च भागवणे अडचणीचे झाले आहे. तरीही केंद्र व राज्य सरकारला काहीही देणे घेणे नाही. एकीकडे शेतीमधील खते बी बियाणे कीटकनाशक औषधी » पान २ वर



हे पत्र मालक मुद्रांक, प्रकाशक, संपादक शेख फारुक शेख हमीद यांनी आर एम प्रिंटर्स, बार्शी रोड बीड -४३११२२ येथे छापून सा. माझी सरकार कार्यालय घर क्र. ३-३-१७६, आशोक नगर ढगे कॉलनी बीड, ता. जि. बीड (महाराष्ट्र) - ४३११२२ येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी : ९४२३३०९३०२. majhisarkar2023@gmail.com (या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, सर्व वाद बीड न्यायालय अंतर्गत)

Daily Evening Majhi Sarkar News paper Owenr, Printer Publisher, Editor Shaikh Farooq Shaikh Hamid Has printed At R.m Offset Barshi Road, Beed. Dist. Beed (Maharashtra 431122) and Published At Daily Majhi Sarkar, Hous No, 3-3-176, Ashok Nagar, Dhage Colony Beed. tq.Dist.Beed Maharashtra 431122 Mob- 9423309302, Epaper : majhisarkar.com, Email : majhisarkar2023@gmail.com